


Postal Registration No- SRP/127/2024-26
RNI No. MAH/MAR/2015/74917
dainikpravarateer01@gmail.com
9970 96 8399
विकासाचा पुरस्कार - अन्यायाचा तिरस्कार
सायं. दैनिक प्रवरा पब्लिकेशन

# प्रवरातीर

मुख्य संपादक : शिवपालसिंह प्र. ठाकुर 9372013375
संपादक : धिरजसिंह शिवपालसिंह प्र. ठाकुर 9970968399




वर्ष ११ वे | अंक २१४ वा | पाने ४ | किंमत २ रु.
संगमनेर - अकोले - कोपरगाव - रहाता - राहुरी
वार बुधवार दिनांक २४ जून २०२६











## चोर तर चोर वरतून शिरजोर! संगमनेरात भेसळयुक्त पनीर कमी दरात विकले जात असल्याचा संशय..

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर शहरातील चैतन्यनगर परिसरातून कथित भेसळयुक्त पनीर विक्री होत असल्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले



आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काही व्यावसायिक कमी दरात पनीर विकून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.
बाजारभाव सुमारे ४०० रुपये प्रतिकिलो असताना काही

(पान ०२ वर...)

## खुशखबर : मान्सून सक्रिय. अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट : पाणलोटातही पाऊस

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

दीर्घ विश्रांतीनंतर मान्सूनने पुन्हा एकदा जोरदार मुसंडी मारत महाराष्ट्रात वेगाने प्रगती केली आहे. पुण्यासह राज्यातील



विविध भाग, अहिल्यानगर जिल्ह्यातील दक्षिण भाग तसेच मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याने पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पेरण्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा

(पान ०२ वर...)

## रोटरीक्लबने आयोजित केलेला श्रमप्रतिष्ठा सन्मान सोहळा हा प्रेरणादायी उपक्रम - ज्येष्ठनेते बाळासाहेब थोरात

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

"रोटरी क्लबने आयोजित केलेला हा प्रेरणादायी उपक्रम समाजासाठी निश्चितच आदर्शवत आहे. अशा सोहळ्यांमधून कष्ट, त्याग, संस्कार आणि पालकांविषयीचा आदर या मूल्यांना बळ मिळते तसेच



नव्या पिढीला मेहनत, जिद्द आणि कृतज्ञतेची प्रेरणा मिळते.असे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते

(पान ०२ वर...)

## विकासकामात अजिबात तडजोड होणार नाही : आ खताळ चिखली ते वडापूर अमृतेश्वर मंदिर रस्ते कामाचा शुभारंभ

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

चिखली गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व कामांना प्राधान्य देत निधी उपलब्ध करून दिला जाईल. विकासकामांमध्ये कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, असा विश्वास आमदार अमोल




खताळ यांनी व्यक्त केला.
संगमनेर तालुक्यातील चिखली येथे चिखली ते वडापूर अमृतेश्वर मंदिर प्रत्येक कामासह इतर रस्ते कामांचे भूमिपूजन आणि विविध विकासकामांची लोकार्पण आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झाले

(पान ०२ वर...)







## संगमनेरमध्ये वाईन शॉप स्थलांतरास तीव्र विरोध महिलांसह नागरिकांचे राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन




**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर शहरातील टॉप टेन इम्पेरियल (यशोधन समोर) येथे प्रस्तावित वाईन शॉप स्थलांतरास स्थानिक नागरिक, महिला व व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवित राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन सादर केले. टॉप टेन इम्पेरियल येथील स्थानिक व्यापारी व्यावसायिक यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य दारूबंदी कृती समितीचे

(पान ०२ वर...)

# चोर तर चोर वरतून शिरजोर! संगमनेरात भेसळयुक्त पनीर कमी दरात विकले जात असल्याचा संशय..

ठिकाणी २०० रुपयांमध्ये पनीर विकले जात असल्याने त्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्वस्त दराच्या मोहापायी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, चैतन्यनगर परिसरातून २ ठिकाणांवरून तसेच जनतानगर येथील १ ठिकाणांवरून भेसळयुक्त पनीरचा पुरवठा होत असल्याचा संशय असून ते ग्राहक व काही हॉटेल व्यावसायिकांना राजरोसपणे टू- व्हीलरवर भेसळयुक्त पनीर घेऊन जातांना परिसरातील नागरिकांनी बघितले आहे. संबंधित यंत्रणांनी याची सखोल चौकशी करून नमुने तपासणीसाठी पाठवावेत, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, संबंधित प्रकरणाबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाने तपास करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

# खुशखबर : मान्सून सक्रिय. अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट : पाणलोटातही पाऊस

दिलासा मिळाला असून खरीप हंगामाला चालना मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २२ ते २६ जून या कालावधीत यलो अलर्ट जारी केला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ताशी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. रविवारपासून जिल्ह्यातील वातावरणात लक्षणीय बदल जाणवत असून दिवसभर उष्णता जाणवल्यानंतर दुपारनंतर अनेक भागांत पावसाच्या सरी कोसळत आहेत.

मान्सूनने तब्बल १४ दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा वेग घेतला आहे. सोमवारी कोकणातील रत्नागिरी जिल्हा ओलांडून तो रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत पोहोचला. मध्य महाराष्ट्रात सातारा, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यातील मावळ-मुळशी परिसरात त्याची प्रगती झाली. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, कर्जत व जामखेड तालुक्यांसह मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांचा मोठा भाग मान्सूनने व्यापला आहे.

हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांच्या माहितीनुसार मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी वातावरण अत्यंत अनुकूल बनले असून पुढील दोन ते तीन दिवसांत मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात मान्सून पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. वातावरणातील कमी दाबाचा पट्टा दक्षिणेकडे सरकल्याने आणि उष्ण वाऱ्यांचा प्रभाव कमी झाल्याने मान्सूनी वाऱ्यांना बळकटी मिळाली आहे.

दरम्यान, उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याची जीवनदायिनी मानल्या जाणाऱ्या भंडारदरा धरण परिसरात सलग तिसऱ्या दिवशीही जोरदार पाऊस झाला. पाणलोट क्षेत्रातील अनेक भागांत समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रविवारी आणि सोमवारी झालेल्या पावसामुळे धरण क्षेत्रातील जलसाठ्यात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोमवारी सकाळपर्यंतच्या नोंदीनुसार भंडारदरा येथे ११ मिमी, घाटघर १६ मिमी, पांजरे १८ मिमी, रतनवाडी ३१ मिमी आणि वाकी येथे ११ मिमी पावसाची नोंद झाली. आगामी काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने शेतकरी आणि नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**संगमनेर शहरात पाऊस बरसला**

बऱ्याच दिवसांच्या विश्रांतीनंतर काल संगमनेर शहर व परिसरात जोरदार पाऊस झाला यामुळे वातावरणातील उष्णपणा कमी झाला शहर परिसरात पाऊस पडला नव्हता त्यामुळे नागरिकांना उकाड्यातून दिलासा मिळाला आहे

# रोटरीक्लबने आयोजित केलेला श्रमप्रतिष्ठा सन्मान सोहळा हा प्रेरणादायी उपक्रम - ज्येष्ठनेते बाळासाहेबथोरात

बाळासाहेब थोरात यांनी केले.

स्व. के. बी. दादा सभागृह, एस. एम. बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर येथे रोटरी क्लब ऑफ संगमनेरतर्फे आयोजित करण्यात आलेल्या "श्रमप्रतिष्ठा सन्मान सोहळा – २०२६" या कार्यक्रमात कष्टकरी पालकांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी रोटरी क्लब संगमनेरचे अध्यक्ष विश्वनाथ मालानी हे होते तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री संगमनेर भूषण रघुवीर खेडकर रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 चे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य हे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले कि, यशस्वी व्यक्तींचा गौरव समाजात अनेक ठिकाणी होत असतो; मात्र त्या यशामागे आयुष्यभर कष्ट, त्याग, संघर्ष आणि संस्कारांची भक्कम पायाभरणी करणाऱ्या पालकांचा सन्मान क्वचितच होताना दिसतो. अशाच यशामागील खऱ्या शिल्पकारांचा गौरव रोटरी क्लब, संगमनेरच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केला असून हा प्रेरणादायी व प्रशासकीय उपक्रम असल्याचे माजी मंत्री थोरात यांनी म्हंटले.पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी आपल्या मनोगतातून पालकांच्या कष्टांचे मोल अधोरेखित करताना सांगितले की, "कोणत्याही यशस्वी व्यक्तीमागे त्यागी आई-वडिलांचे कष्ट आणि संस्कार उभे असतात. आज सन्मानित होत असलेले हे पालक खऱ्या अर्थाने समाजाचे आदर्श आहेत."

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल रो. अमोल वैद्य यांनी रोटरी क्लब ऑफ संगमनेरच्या सामाजिक व विधायक उपक्रमांचा आढावा घेत आगामी उपक्रमांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.यावर्षी सौ.इंदुमती व .मारुती मुरलीधर फटांगरे (पोखरी बाळेश्वर), सौ. योगिता व श्री.आदित्य दीपक घाटगे (संगमनेर), सौ. संगीता व अशोक लक्ष्मण गायकवाड (नान्नज दुमाला), सौ. सरूबाई व रायभान किसन अनर्थे (चिंचपूर) आणि सौ. शुभांगी व श्री.संजय रावसाहेब दिघे (जोर्वे) या पालकांचा "श्रमप्रतिष्ठा सन्मान पुरस्कार २०२६" देऊन गौरव करण्यात आला.या पालकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दिवस-रात्र परिश्रम करत आपल्या पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. स्वतःच्या इच्छा-आकांक्षा बाजूला ठेवून मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी झटणाऱ्या या पालकांच्या त्यागाचे स्मरण होताच सभागृहातील वातावरण अनेकदा भावुक झाले.

# विकासकामात अजिबात तडजोड होणार नाही : आ खताळ

त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोपान सहाने होते. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रणजीत ढेरंगे भाजप अध्यक्ष अशोक कानवडे नेताजी घुले महेंद्र कोल्हे शंकर वाळे भाऊसाहेब हासे, सोमनाथ सिनारे, साईनाथ सहाने, , तुळशीराम सिनारे, अशोक देशमुख, विक्रांत देशमुख, विकास हासे, सोमनाथ हासे, गणेश,हासे नितीन हासे विठ्ठल सिनारे, यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वर्षभरात चिखली या गावासाठी सुमारे ७९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली.

आमदार खताळ म्हणाले की, लोक मोठ्या विश्वासाने विविध प्रश्न घेऊन माझ्याकडे येतात. केवळ विकास कामेच नव्हे तर कौटुंबिक वाद-विवादां मध्येही समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. जनतेला दिलेला शब्द पाळणे आणि शक्य ते प्रत्येक काम पूर्णत्वास नेणे हेच आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

"येथून मागील काळात तालुक्यातील रस्त्यांचे झालेले नुकसान माझ्या कार्य काळात होऊ देणार नाही. अधिकारी व ठेकेदारांना दर्जेदार काम करण्या बाबतच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत."

महायुती सरकारच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना, साडेसात अश्व शक्तीपर्यंतच्या वीजबिला‍ सवलत, महिलांसाठी विविध योजना तसेच गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत देण्याचे काम प्रभावी पणे सुरू असल्याचे सांगितले

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आतापर्यंत एक कोटी रुपयांहून अधिक निधी तालुक्यातील गरजू रुग्णांसाठी मंजूर करण्यात आला आहे. पुणे, मुंबई आणि नाशिक येथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना आवश्यक ती मदत कार्यालयामार्फत केली जात असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले

संगमनेर तालुक्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने पाठपुरावा आणि प्रयत्न सुरू आहेत. पाणीटंचाई, खराब रस्ते, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, वीजपुरवठा तसेच बिबट्याच्या वाढत्या उपद्रवा सारख्या गंभीर समस्यांवर प्रभावी पणे उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून काम करण्यात येत आहे.

**श्री अमोल खताळ**
**आमदार संगमनेर विधानसभा**

# संगमनेरमध्ये वाईन शॉप स्थलांतरास तीव्र विरोध; महिलांसह नागरिकांचे राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन

जिल्हाध्यक्ष अमरकतारी यांची भेट घेत सदर वाईन शॉप ला विरोध करत कोणत्याही परिस्थितीत वाईन शॉप संगमनेर मध्ये सुरू होऊ नये यासाठी विनंती केली तद नंतर

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांच्या शिष्टमंडळाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संगमनेर कार्यालयात जाऊन निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित जागा ही व्यापारी संकुलामध्ये असून येथे मोठ्या प्रमाणात महिला, ज्येष्ठ नागरिक व कुटुंबीयांची वर्दळ असते. अशा ठिकाणी वाईन शॉप सुरू झाल्यास परिसरातील सुरक्षितता, सामाजिक वातावरण व व्यावसायिक हितसंबंधांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

निवेदनात असेही म्हटले आहे की, संबंधित कॉम्प्लेक्समधील व्यापाऱ्यांनी यापूर्वीच एकमताने अशा प्रकारच्या व्यवसायाला विरोध दर्शविला आहे. वाईन शॉपमुळे परिसरात गर्दी वाढून वाहतूक, पार्किंग आणि कायदा-सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण होऊ शकतात. या ठिकाणी महिलांसाठी अनेक व्यवसायिक दुकानं देखील आहेत महिलांची छेडछाड होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो म्हणूनच सदर वाईन शॉप ला विरोध करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला देखील उपस्थित होत्या तसेच सदर महिलांनी आपल्या व्यथा देखील राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक संगमनेर यांच्या समोर मांडल्या सदर वाईन शॉप जर संगमनेरात आले तर आम्ही रस्त्यावर उतरून कायदा हातात घेऊ भाजप महायुती सरकारने आहे ती दारू ची दुकानें बंद केली पाहिजे या दारूमुळे आमचा संसार उघड्यावर आला असेही महिलांच्या वतीने सांगण्यात आले व आमदार अमोल भाऊ खताळ तसेच नगराध्यक्ष मैथिली ताई तांबे यांनी देखील सदर प्रकरणात लक्ष घालून कोणत्याही परिस्थितीत संगमनेर मध्ये दारू चं नवीन दुकान उघडलं नाही पाहिजे यासाठी प्रयत्न करावे अशी एकमुखी मागणी करण्यात आली तसेच इतर व्यावसायिकांच्या व्यवसायावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते. प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन संबंधित वाईन शॉपला स्थलांतराची परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली.





# मंडलाधिकाऱ्यांच्या नावाने लाच घेणारा खाजगी माणूस पोलिसांच्या जाळ्यात

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या धडक कारवाईत मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने ५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या एका खाजगी इसमाला रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईमुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली असून संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितीन किसन खर्डे (वय २९, रा. चंदनापुरी झोळे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या खाजगी इसमाचे नाव आहे. नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली. तक्रारदाराच्या तक्रारीनंतर सापळा रचून आरोपीला लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार जेसीबी मशीनच्या साहाय्याने शेतजमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम करतात. ८ जून रोजी त्यांना तलाठी कार्यालयात बोलावण्यात आले होते. त्यानंतर आरोपी नितीन खर्डे याने तक्रारदाराशी संपर्क साधून शेतजमिनीचे काम कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू ठेवण्यासाठी मंडळ अधिकाऱ्यांच्या नावाने ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तसेच लाच न दिल्यास अवैध गौण खनिज उत्खननाचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.




या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या तक्रारदाराने नाशिक एसीबी कार्यालयात तक्रार दाखल केली. १९ जून रोजी एसीबीने पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर २२ जून रोजी विशेष सापळा रचण्यात आला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून ५०० रुपयांच्या १० नोटांच्या स्वरूपात ५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारत असतानाच एसीबीच्या पथकाने आरोपीला रंगेहात पकडले.

सदर कारवाई नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी, पोलीस हवालदार संदीप वनवे आणि पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद पाळदे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

या घटनेनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणताही शासकीय अधिकारी, कर्मचारी अथवा त्याच्या वतीने कोणीही लाचेची मागणी करत असल्यास तात्काळ एसीबीकडे तक्रार करावी. भ्रष्टाचाराविरोधातील अशा कारवायांमुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# योगसाधनेत मालपाणी विद्यालयाचा झेंडा उंचावला; प्रथम क्रमांकाचे सन्मान चिन्ह पटकावले

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय योग उत्सव समिती, संगमनेर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य योग दिन कार्यक्रमात मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट योगसाधनेचे दर्शन घडवत प्रथम क्रमांकाचे सन्मान चिन्ह प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध आणि आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

मालपाणी लॉन्स येथे आयोजित या कार्यक्रमात संगमनेर शहरातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या स्पर्धात्मक वातावरणात मालपाणी विद्यालयाच्या इयत्ता सातवी आणि आठवीतील एकूण ३२० विद्यार्थ्यांपैकी ६६




विद्यार्थ्यांनी मंचावर योगाचे प्रभावी सादरीकरण केले. विशेषतः चक्रासनासह विविध योगासनांचे अचूक, लयबद्ध आणि समन्वयपूर्ण प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेने, शारीरिक संतुलनाने आणि योगाभ्यासातील सफाईदारपणाने उपस्थित प्रेक्षकांसह परीक्षकांनाही प्रभावित केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत मालपाणी विद्यालयाला प्रथम क्रमांकाचे सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रमांतील गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

कार्यक्रमप्रसंगी गीता परिवारचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी दाखविलेली मेहनत, सातत्य आणि योगाविषयीची आवड ही प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांनी सन्मान चिन्ह प्रदान केले.

या योग दिन कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना विद्यालयातील सुजाता शेलार, अंबादास बुलाखे, अमोल सस्कर, प्रतापराव ठोंबरे, दिपक रहाणे आणि श्रावणी बुकदाने यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना हे यश संपादन करता आले.

# अकोलेत सहा महिन्यांत 200 हेक्टर वनक्षेत्र जळून खाक!
## 147 आग लागण्याच्या घटनांनी वनविभागासमोर मोठे आव्हान

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

अकोले-राजूर परिसरातील वनक्षेत्रांमध्ये गेल्या सहा महिन्यांत तब्बल १४७ आग लागण्याच्या घटना घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या आगींमुळे सुमारे २०० हेक्टरहून अधिक वनक्षेत्र जळून खाक झाले असून जैवविविधता, वनसंपदा आणि वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या वाढत्या घटनांमुळे वनविभागासमोर गंभीर आव्हान निर्माण झाले आहे.

वनक्षेत्रातील आगींचे प्रमाण यंदा चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. उन्हाळ्यातील तीव्र उष्णता, कोरडे गवत, मानवी निष्काळजीपणा तसेच काही ठिकाणी जाणूनबुजून लावल्या जाणाऱ्या आगी ही प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जात आहे. आग



लागल्यानंतर डोंगराळ आणि दुर्गम भागात पोहोचणे कठीण जात असल्याने अनेकदा मोठे क्षेत्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडते.

या आगींमुळे हजारो झाडे, औषधी वनस्पती आणि विविध प्रकारचे वन्यजीव धोक्यात आले आहेत. पक्ष्यांची घरटी, लहान प्राणी तसेच नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्याने पर्यावरणीय समतोलावरही परिणाम होत आहे. वनक्षेत्राचे नुकसान झाल्याने भविष्यात मृदाक्षरण, पाणीटंचाई आणि हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वनविभागाकडून आग नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अग्निरोधक पट्टे तयार करणे, संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवणे, वनरक्षकांची गस्त वाढविणे आणि जनजागृती मोहिमा राबविणे यावर भर दिला जात आहे. तसेच नागरिकांनी जंगल परिसरात जळती वस्तू फेकू नये, शेकोट्या पेटवू नयेत आणि आग लागल्याचे दिसताच तात्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनीही वनसंवर्धनासाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.






# वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्या - आमदार खताळ

## निवृत्तीनाथ पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांना सूचना; सुविधांचा घेतला आढावा

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर जाणाऱ्या संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये तसेच त्यांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून आवश्यक ती दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना आमदार अमोल खताळ यांनी दिल्या आहेत.

तालुक्यातील पारेगाव बुद्रुक येथील हनुमान मंदिरात पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पारेगाव बु. ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी पालखी मार्गावरील सुविधा, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वाहतूक नियंत्रण यांसह इतर आवश्यक उपाययोजनांचा अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. यावेळी संगमनेर उपविभागाचे प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, प्रभारी तालुका आरोग्य



अधिकारी कामेश टावरे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे जेष्ठ नेते भीमराज चत्तर, एकनाथ मुंगसे, विठ्ठल घोरपडे, राजेंद्र सोनवणे, संपत फड, हरीश चकोर, श्रीकांत गोमासे, किसन चत्तर, डॉ. संतोष डांगे, दत्तात्रय दिघे, सुरेश दळवी, रावसाहेब गडाख, किशोर गडाख, बाबासाहेब गोर्डे, पुंजाहरी गडाख, सुनील वाकचौरे, भीमराज गडाख, मधुकर गडाख, सूर्यभान गडाख, सुभाष गडाख, आकाश गडाख, अनिकेत गाडेकर, राजेंद्र गुंजाळ, निलेश गडाख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पालखी सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. या निधीचा योग्य वापर करून पालखी मार्गावरील सर्व आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत. वारकऱ्यांना मुक्काम, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छतागृहे आणि सुरक्षित प्रवास यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांनी कटिबद्ध राहावे, अशा सूचना देखील आमदार अमोल खताळ यांनी दिल्या. यावेळी प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी दिली. पारेगावच्या वतीने महायुतीचे , सूत्रसंचालन रावसाहेब गडाख यांनी केले प्रस्ताविका आणि स्वागत सुरेश दळवी यांनी केले. तर आभार कैलास गोर्डे यांनी मानले

**पालखी मार्गाची आमदार खताळ यांनी केली पाहणी**

नाशिक जिल्ह्यातून अहिल्यानगर जिल्ह्यात पालखीचे आगमन होत असणाऱ्या अश्विनीनाथ गड परिसरा तील पालखी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी रस्त्यांची स्थिती, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तसेच वारकऱ्यांच्या सोयीसाठी उभारण्यात येणाऱ्या उपायोजना बाबतचा आढावा घेतला

# योगासन क्रीडा प्रकारात जागतिक करिअरच्या संधी; आंतरराष्ट्रीय योग दिनी दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

योगासन क्रीडा प्रकारात आता जागतिक स्तरावर करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र योगासन स्पोर्ट फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मालपाणी लॉन्स येथे आयोजित योग उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

गीतापरिवाराच्या पुढाकाराने आणि आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात संगमनेरमधील आठ शाळांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




पी. जे. आंबरे पाटील कन्या विद्यालय, ध्रुव ग्लोबल स्कूल, जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, मातोश्री रुक्मिणीबाई मालपाणी विद्यालय, पद्मरसिक शाह विद्यालय, कळसकर विद्यालय, बी. टी. मेहेर विद्यालय आणि बी. जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर केली.

योगासनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. स्मरणशक्ती, आकलनशक्ती आणि कार्यक्षमता वाढविण्याचे सामर्थ्य योगसाधनेत असल्याचे डॉ. मालपाणी यांनी सांगितले. तसेच नियमित योगाभ्यासामुळे जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतात, असेही त्यांनी नमूद केले.


कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी चक्रासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या स्पर्धकांना चषक प्रदान करण्यात आले. ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कठीण योगासनांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची दाद मिळवली. तसेच प्रांजल व्हन्रा आणि रोहन तायडे यांच्या एकल योग सादरीकरणालाही भरभरून प्रतिसाद मिळाला.

# ओझर बंधाऱ्याजवळ प्रवरा नदीत अवैध वाळू उपसा नदी प्रवाहाला अडथळा, पुराच्या धोक्याची तक्रार

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्यातील ओझर बंधाऱ्याच्या परिसरात प्रवरा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या वाळू उपशामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होत असून भविष्यात पुराचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून आश्वी पोलिसांनी अज्ञात वाळू तस्करांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

संगमनेर पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता प्रीतम बाळासाहेब शेवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ओझर बंधाऱ्याच्या वरच्या बाजूस प्रवरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा करण्यात आला आहे. त्यामुळे नदीपात्रात मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून पाण्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या आवर्तनावरही त्याचा विपरीत परिणाम होत असून पाण्याचा प्रवाह मंदावल्याने आवर्तन कालावधी वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच नदीतील पाणी प्रदूषित होण्याची शक्यता वाढली आहे.



याशिवाय प्रवरा डावा कालवा सिंचन व्यवस्थापन उपविभागाचे उपविभागीय अधिकारी योगेश जगन्नाथ घोगरे यांनीही स्वतंत्र तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या पाहणीत ओझर बंधाऱ्याच्या खालच्या बाजूसही अज्ञात व्यक्तींनी वाळू उपसा केल्याचे निदर्शनास आले. या बेकायदेशीर उत्खननामुळे नदीकाठाच्या संरचनेला धोका निर्माण झाला असून भविष्यात पूरस्थिती उद्भवल्यास गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

प्रवरा नदी ही संगमनेरसह परिसरातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाची जीवनवाहिनी मानली जाते.

# लग्न जोडणाऱ्या लुटारू टोळीवर गुन्हा दाखल झाल्याने जिल्ह्यात खळबळ

**प्रवरातीर | वृतसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश झाला असून पोलिसांनी तथाकथित 'लुटेरी दुल्हन'सह संबंधित टोळीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या व्यक्तीला जाळ्यात ओढून लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विवाहासाठी वधू शोधत असलेल्या व्यक्तीशी आरोपींनी संपर्क साधला. विश्वास संपादन करून लग्न जुळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर वधू व तिच्या नातेवाईकांच्या नावाखाली विविध कारणे सांगत सुरुवातीला २ लाख ३० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. चर्चा आणि सौद्यानंतर ही रक्कम १ लाख ६० हजार




रुपयांवर निश्चित करण्यात आली.

तक्रारदाराने विवाह निश्चित होईल या विश्वासाने संबंधितांना ठरलेली रक्कम दिली. मात्र पैसे स्वीकारल्यानंतर आरोपींकडून टाळाटाळ सुरू झाली. काही दिवसांनी वधू आणि तिच्याशी संबंधित व्यक्तींनी संपर्क तोडला. संशय आल्याने तक्रारदाराने चौकशी केली असता आपली फसवणूक झाल्याचे उघड झाले.

या प्रकरणी तक्रारदाराने पोलिसांत धाव घेतल्यानंतर तपास सुरू करण्यात आला. प्राथमिक चौकशीत विवाहाच्या नावाखाली फसवणूक करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने टोळी कार्यरत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी संबंधित महिला आणि तिच्या साथीदारांविरोधात फसवणूक व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून या टोळीने इतर ठिकाणी अशाच प्रकारे फसवणूक केली आहे का, याचाही तपास केला जात आहे. विवाह जुळवून देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार करताना नागरिकांनी सावध राहावे, संबंधित व्यक्तींची संपूर्ण माहिती पडताळून पाहावी आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

हे सायं. दैनिक प्रकाशक, प्रिंटर्स संपादक श्री. शिवपालसिंह प्रतापसिंह ठाकूर यांनी प्रवरा प्रिंटींग प्रेस, घोडेकर मळा, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर (महाराष्ट्र) येथे छापून याच ठिकाणी कार्यालयात प्रकाशित केले. पी.आर.बी. कायद्यानुसार अंकात प्रसिध्द केलेल्या मजकुराची जबाबदारी यांचेवर राहील. मालक संपादक धिरजसिंह शिवपालसिंह ठाकूर, मो ९९७०९६८३९९ संगमनेर न्यायकक्षेत